# **महाराष्ट्र राज्य वन्यजीव मंडळाची ८ वी बैठक, दिनांक २० फेब्रुवारी २०१४**

## कार्यवृत्तांत

महाराष्ट्र राज्य वन्यजीव मंडळाची ८ वी बैठक गुरूवार दिनांक २० फेब्रुवारी २०१४ रोजी मा. मुख्यमंत्री यांचे समिती कक्ष, मंत्रालय मुंबई येथे मा. मुख्यमंत्री, महाराष्ट्र राज्य, नामदार श्री. पृथ्वीराजजी चव्हाण यांचे अध्यक्षतेखाली सकाळी १०.०० वाजता संपन्न झाली. बैठकीतील इतर उपस्थितांची नांवे सोबतच्या यादीत दिलेली आहेत (परिशिष्ट-१).

सभेच्या सुरूवातीस प्रधान मुख्य वनसंरक्षक (वन्यजीव), महाराष्ट्र राज्य नागपूर तथा सदस्य सचिव यांनी सर्व उपस्थितांचे स्वागत करून सभेची पार्श्वभूमि व सभेत ठेवण्यांत आलेल्या विषयांबाबत प्रास्ताविक केले. त्यानंतर बैठकीत विषयसूची प्रमाणे मुद्येनिहाय चर्चा झाली. बैठकीत देण्यांत आलेली माहिती, झालेली चर्चा व मंडळाने घेतलेले निर्णय खालीलप्रमाणे आहेत.

**विषय क्रमांक १(अ) : दिनांक २४ जानेवारी २०१३ रोजी पुणे येथे झालेल्या ७ व्या बैठकीचे कार्यवृत्तांत कायम करणे.**

दिनांक २४ जानेवारी २०१३ रोजीचे कार्यवृत्तांत सर्व सभासदांना पाठविण्यांत आलेले असून त्यावर कोणत्याही सभासदांकडून अभिप्राय प्राप्त झालेले नाहीत. यास्तव सदर सभेच्या कार्यवृत्तं ातास मान्यता प्रदान करण्यांत आली.

**विषय क्रमांक १(ब) : महाराष्ट्र राज्य वन्यजीव मंडळाच्या दिनांक २४-०१-२०१३ रोजी झालेल्या ७ व्या बैठकीत घेतलेल्या निर्णयांवर केलेली कार्यवाही.**

याबाबतची माहिती मंडळासमोर ठेवण्यांत आली व त्यास खिंडसी पुरक कालवा योजना प्रकल्पास मंडळाने मान्यता प्रदान केली.

त्यातील **मुद्या क्रमांक २.४ ``नागपूर पेंच पाटबंधारे प्रकल्प खिंडसी पुरक कालवा योजना ता.पारशिवनी जि.नागपूर प्रकल्पाकरिता १६.४० हे. वनजमीनीच्या वळती करण्याच्या प्रस्तावाला मान्यता देणे``** याबाबत सखोल चर्चा करण्यांत येवून सातव्या बैठकीमध्ये मंडळाने नेमूण दिलेल्या समितीने आपला अहवाल प्रधान मुख्य वनसंरक्षक (वन्यजीव) यांचे मार्फत मंडळास सादर करण्यास्तव पाठविलेला होता सदर अहवाल मंडळाचे निदर्शनास आणून देण्यांत आला. सदर अहवालात खिंडसी पुरक कालवा या प्रकल्पामुळे वन्यप्राण्यांच्या भ्रमणमार्गात कालव्यांमुळे अडथळे येतात ते प्रभावीपणे नियमित करण्याकरिता स्थळनिहाय उपाययोजना आखून अहवाल तयार करण्यांत आला असल्याचे मुख्य अभियंता, पाटबंधारे मंडळ तथा समिती सदस्य यांनी मंडळाचे निदर्शनास आणून दिले. सदर प्रस्तावासारखे उदाहरणादाखल उपाययोजनांचा एक भाग म्हणून बोर येथे केलेल्या उपाययोजनांची उदा.तयार करण्यांत आलेल्या ओव्हर पासेस इत्यादिंची माहिती पाटबंधारे विभागाकडून मंडळासमोर सादर केली. वन्यप्राण्यासांठी करावयाच्या उपाययोजनांचे संदर्भात जुन्या प्रकल्पाकरिता रूपये २० कोटी आणि सद्या सुरू असलेल्या प्रकल्पाकरिता रूपये ११० कोटी एवढा खर्च अपेक्षीत असून विदर्भ पाटबंधारे विकास महामंडळाकडून सदरचा खर्च करण्यांबाबत कार्यवाही करण्यांत येईल ही बाब मंडळाचे निदर्शनास आणून देण्यांत आली.

यापुढे सिंचन/पाटबंधारे/जलसंधारण विभागाचे सर्व प्रकल्पाचे प्रस्तावाकरिता वन्यजीव अधिका-यांचे समन्वयाने तपासून प्रकल्पांमुळे वन्यप्राण्यांचा अधिवास तसेच भ्रमणमार्ग यामध्ये अडथळे येणार नाहीत याकरिता उपाययोजना सूचवूनच प्रस्ताव सादर करण्यांत येतील याची दक्षता घ्यावी असे मंडळांनी निर्देश दिलेत. याशिवाय वन्यप्राण्यांच्या अधिवासाचा विकास व संरक्षण करिता प्रकल्प खर्चाच्या २% एवढी रक्कम शासकिय खात्यात किंवा संबंधीत व्याघ्र संवर्धन प्रतिष्ठानच्या खात्यात जमा करण्याचे देखील निर्देश दिलेत. सर्व नवीन सिंचन प्रकल्पांचे निर्णय घेणेचे अगोदर वन (संवर्धन) अधिनियम, १९८० साठी वन्यजीव संवर्धनाकरिता उपाययोजनांची तरतुद करणे आवश्यक राहील. पाटबंधारे विभागाने वन्यप्राण्यासांठी केलेल्या उपाययोजनांबाबत जे सादरीकरण केले त्याबाबत मंडळाने समाधान व्यक्त केले.

वरीलप्रमाणेच तरतुद **मुद्दा २.२ `` वनजमीन-रायगड ताम्बडी लघुपाटबंधारे योजना ता. रोहा जि. रायगड २.८६ हेक्टर प्रस्तावाला मान्यता देणे``** या प्रकल्पामध्ये देखील करण्यांत यावी असे मंडळाने निर्देश दिलेत. सर्व उपाययोजना हया स्थळनिहाय (site specific) असाव्यात असे मा. अध्यक्षांनी सांगीतले.

मंडळाच्या सातव्या बैठकीमध्ये रामसर साईटची शिफारस करण्याचा मुद्दा चर्चेस आला असता ज्याठिकाणी संरक्षीत क्षेत्रे घोषीत झालेली आहेत त्याच क्षेत्राचा विचार करण्यांत आला होता. त्यामुळे शिवडी कोस्ट क्षेत्र रामसर साईट म्हणून घोषीत करण्यांत आलेले नव्हते. परंतु मुंबई जवळ निसर्ग पर्यटनाच्यादृष्टीने हे स्थळ अतिशय महत्वाचे असल्यामुळे या स्थळाचा त्यादृष्टीने विचार करून शिवडी कोस्ट क्षेत्र सामान्य जनतेला अनुकुल असे निसर्ग पर्यटनस्थळ म्हणून विकसीत करावे असे मंडळाच्या सदस्यांनी सूचविले. पर्यटन विकास मंडळाच्या वेबसाईटवर हे क्षेत्र असावे असे निर्देश मा.अध्यक्षांनी दिलेत.

**विषय क्रमांक २ : राष्ट्रीय उद्यान/अभयारण्यात व त्यासभोवतालच्या १० कि.मी. च्या परिसरातील इतर विकास कामांना मंजूरी देणे.**

| अ.क्र. | मुद्दा | झालेली चर्चा | घेतलेले निर्णय |
|---|---|---|---|
| २.१ | **नरडवे ता. कणकवली जि. सिंधुदूर्ग मध्यम प्रकल्पासाठी ३४.१३५ हे. वनजमीन (Identified forest/ restored forest) वळतीकरण करण्याचा प्रस्ताव.** | सावंतवाडी जिल्हयाच्या कणकवली तालुक्यातील नरडवे मध्यम प्रकल्पापासून ३.०० मे. वॅट विद्यूत निर्मीती होणार असून पिण्याच्या पाण्याकरिता प्रकल्पाचा उपयोग होणार आहे. सदर प्रकल्पाकरीता एकुण ३४.१३५ हे. Identified forest/restored forest क्षेत्राची आवश्यकता आहे. सदरचे प्रस्तावीत क्षेत्र राधानगरी अभयारण्य क्षेत्रापासून ०.७५ ते २.०० कि.मी. अंतरावर असुन प्रस्तावीत राधानगरी अभयारण्याचे पर्यावरण संवेदनशील क्षेत्रात येत असल्याने वनेत्तर कामे करण्यासाठी त्यास राष्ट्रीय वन्यजीव मंडळाची मान्यता घेणे आवश्यक आहे. | **प्रकल्पाच्या अंदाजीत खर्चाच्या २% एवढी रक्कम वन्यप्राण्यांच्या वसतीस्थानांचा विकास आणि संरक्षण या कामाकरिता संबंधीत वन्यजीव विभागाकडे जमा करण्याच्या तसेच मुख्य वन्यजीव रक्षक यांनी दिलेल्या अटीसह सदर प्रस्तावाची राष्ट्रीय वन्यजीव मंडळास शिफारस करण्यास्तव या प्रस्तावास मंडळाने मान्यता प्रदान केली.** |
| २.२ | **मौ. करजोण, तिल्हेर, दिपीवली पारोड, ऊसगांव, शिवणसाई आणि चांदिप ता. वसई जि. ठाणे येथील खोलसापाडा-१ लघूपाटबंधारे योजनेखाली वनजमीन मागणी प्रस्ताव क्षेत्र १३९.४७३ हे. (पैकी ४६.३६२ हे. वनक्षेत्र व उर्वरीत ९३.१११ हे. वनेत्तर क्षेत्र)** | ठाणे जिल्हयातील वसई तालुक्यामध्ये खोलसापाडा-१ या मध्यम प्रकल्पाचा उपयोग त्या क्षेत्रातील आदिवासी भागाच्या ७०५ हे. जमीनीचे जलसिंचनाकरीता होणार आहे. सदर प्रकल्पाकरीता एकुण १३९.४७३ हे. क्षेत्राची आवश्यकता असुन त्यापैकी ४६.३६२ हे. वनक्षेत्र लागणार आहे. उर्वरीत ९३.१११ हे. क्षेत्र हे वनेत्तर क्षेत्र आहे. सदरचे प्रस्तावीत क्षेत्र हे तुंगारेश्वर अभयारण्य क्षेत्रापासून ४.५० कि.मी. हवाई अंतरावर असुन तुंगारेश्वर अभयारण्याचे १० कि.मी. परिघात असल्याने वनेत्तर कामे करण्यासाठी त्यास राष्ट्रीय वन्यजीव मंडळाची मान्यता घेणे आवश्यक आहे. | मा. अध्यक्षांनी हा प्रस्ताव महत्वाचा असल्याचे निदर्शनास आणून दिले.<br>**मंडळातील सदस्य श्री. अनिष अंधेरीया व श्री. बिट्टु सहगल आणि अपर प्रधान मुख्य वनसंरक्षक (वन्यजीव) पश्चिम, मुंबई यांचे समितीने प्रत्यक्ष जागेचे निरीक्षण करून १५ दिवसात त्यांचा अहवाल सादर करण्याचे निर्देश दिलेत.**<br>**प्रकल्पाच्या अंदाजीत खर्चाच्या २% एवढी रक्कम वन्यप्राण्यांच्या वसतीस्थानांचा विकास आणि संरक्षण या कामाकरिता संबंधीत वन्यजीव विभागाकडे जमा करण्याच्या तसेच मुख्य वन्यजीव रक्षक यांनी दिलेल्या अटीसह सदर प्रस्तावाची राष्ट्रीय वन्यजीव मंडळास शिफारस करण्यास्तव या प्रस्तावास मंडळाने मान्यता प्रदान केली.** |

| | | | |
|---|---|---|---|
| २.३ | **अमरावती जिल्हयातील धारणी तालुक्यातील पाटीया लघूपाटबंधारे प्रकल्प क्षेत्र ९.३३ हे. वनक्षेत्र पश्चिम मेळघाट वनविभाग परतवाडा.** | अमरावती जिल्हयातील धारणी तालुक्यामधील पाटीया, या गावा जवळ असलेल्या लोकल नाल्यावर पश्चिम मेळघाट वन विभाग परतवाडा यांचे अधिपत्याखालील वनखंड क्रमांक ६९१ व ६६५ येथिल ९.३३ हे. वनक्षेत्रावर पाटीया लघुपाटबंधारे प्रकल्प योजना कार्यान्वीत करावयाची आहे. सदर क्षेत्र मेळघाट व्याघ्र प्रकल्प बफर क्षेत्रापासून १.५ कि.मी. अंतरावर व कोअर क्षेत्रापासून ६.९० कि.मी. अंतरावर आहे. हे क्षेत्र मेळघाट व्याघ्र प्रकल्पाचे सद्याचे म्हणजे १० कि.मी.चे पर्यावरण संवेदनशील क्षेत्रात येत असल्याने वनेत्तर कामे करण्यासाठी त्यास राष्ट्रीय वन्यजीव मंडळाची मान्यता घेणे आवश्यक असुन त्यासोबतच राज्य वन्यजीव मंडळाची मान्यता घेणे आवश्यक आहे. | **प्रकल्पाच्या अंदाजीत खर्चाच्या २% एवढी रक्कम वन्यप्राण्यांच्या वसतीस्थानांचा विकास आणि संरक्षण या कामाकरिता मेळघाट व्याघ्र संवर्धन प्रतिष्ठान कडे जमा करण्याच्या तसेच मुख्य वन्यजीव रक्षक यांनी दिलेल्या अटीसह सदर प्रस्तावाची राष्ट्रीय वन्यजीव मंडळास शिफारस करण्यास्तव या प्रस्तावास मंडळाने मान्यता प्रदान केली.** |
| २.४ | **शिरापूर उपसा सिंचन योजनेचे प्रस्तावाबाबत (माळढोक पक्षी अभयारण्य)** | प्रस्तावित शिरापूर उपसा सिंचन योजना निर्मीतीचा प्रस्ताव प्राप्त झालेला असून, त्यामध्ये २३ गावांचे क्षेत्र प्रभावित (Command Area) होणार आहे. त्यापैकी खालील ११ गावे माळढोक पक्षी अभयारण्य क्षेत्रातील आहेत.<br>१) नानज, २) दरफळ बीबी ३) रानम्हसाळे ४) करंबा ५) अकोलेकाटी ६) मार्डी ७) गुलवंची ८) खेड ९) वडाला १०) गवळी दरफळ ११) नारोटेवाडी ही गावे उत्तर सोलापूर तालूक्यातील आहेत.<br>सदर उपसा सिंचन योजनेकरीता लागणारे पाणी हे सिना के.टी. वेअरव्दारे दोन टप्प्यात पूरविल्या / आणल्या जाणार असून, त्याकरीता कालवे, वितरीका, लघूकालवे हे काम होणार आहे. कालव्याची रुंदी ६० मीटर, वितरीकाची रुंदी ३० मीटर व लघू कालव्यांची रुंदी १५-२० मीटर राहणार आहे.<br>माळढोक पक्षी अभयारण्यातील सदर क्षेत्रात माळढोक पक्षांचा वावर नानज आणि मार्डी क्षेत्रांत आहे. तसेच प्रस्तावित कामाचे क्षेत्रातील परिसरात लांडगा, काळविट, कोल्हा, बहिरी ससाना, मोर, लांडोर, घोरपड व अजगर यांचा वावर आहे, कालव्यामूळे सदर वन्यप्राणी व माळढोक पक्षी यांच्या अधिवास क्षेत्रावर विपरीत परिणाम होणार आहे. तसेच वन्यप्राण्यांना अपघात होण्याची शक्यता नाकारता येत नाही. तसेच सद्यस्थितीत माळढोक पक्षी अभयारण्यामध्ये माळढोक पक्षांची संख्या ७५ वरुन अंदाजे १० च्या | **प्रकल्पाच्या अंदाजीत खर्चाच्या २% एवढी रक्कम वन्यप्राण्यांच्या वसतीस्थानांचा विकास आणि संरक्षण या कामाकरिता संबंधीत वन्यजीव विभागाकडे जमा करण्याच्या तसेच मुख्य वन्यजीव रक्षक यांनी दिलेल्या अटीसह सदर प्रस्तावाची राष्ट्रीय वन्यजीव मंडळास शिफारस करण्यास्तव या प्रस्तावास मंडळाने मान्यता प्रदान केली.** |

| | | | |
|---|---|---|---|
| | | दरम्यान शिल्लक राहीलेले आहेत. त्यामुळे सदर पक्षी, वन्यप्राण्यांची सुरक्षा व अधिवास संवर्धनाचे हित लक्षात घेणे आवश्यक आहे.<br>माळढोक पक्षी अभयारण्य क्षेत्रातील ११ गावाचे क्षेत्र १९६२.२४ हे. असून, त्यापैकी नहराचे कामाकरीता १५१.८२ हे. क्षेत्राची आवश्यकता लागणार आहे. अभयारण्य क्षेत्रातून जाणा-या कालव्याचे काम हे तुकडया-तुकडयामध्ये भूमीगत RCC BOX तसेच RCC PIPES व्दारे होणार असून अभयारण्य क्षेत्राबाहेर उर्वरित कालवे, वितरीका व लघुकालवे खुले राहणार आहेत.<br>सदर प्रकल्प तेथील लोकांच्या हिताचा असून व त्यांच्या आशा बळावलेल्या असल्याने, माळढोक पक्षी अभयारण्याचे संवर्धनाचे हेतूने शेतीचे पिकांना योग्य बंधने घालण्याच्या अटीवर मान्यता देण्यास शिफारस केलेली आहे. काही अटी व शर्तीवर मुख्य वन्यजीव रक्षकांनी सदर प्रस्तावाची शिफारस केली आहे. | |
| २.५ | **आलेवाडी बृहत लघू पाटबंधारे प्रकल्प योजना ता. संग्रामपूर जि. बुलढाणा खाजगी क्षेत्र २७३.०२ हे.** | बुलढाणा जिल्हयातील संग्रामपूर तालुक्यामधील आलेवाडी, सायखेड, चिंचारी, लाडणपूर व वासली या गावाच्या मालकी क्षेत्रातील २७३.०२ हे.खाजगी क्षेत्रावर आलेवाडी बृहत लघुपाटबंधारे प्रकल्प योजना कार्यान्वीत करावयाची आहे. सदर क्षेत्र मेळघाट व्याघ्र प्रकल्प क्षेत्राचे अधिपत्याखालील अंबाबारवा या अभयारण्याचे सिमेपासून अंदाजे १.५० ते १.७५ कि.मी.हवाई अंतरावर असुन वान अभयारण्य व अंबाबारवा अभयारण्याचे १०.०० कि.मी. परिसरात येते. हे क्षेत्र मेळघाट व्याघ्र प्रकल्पाचे प्रस्तावीत पर्यावरण संवेदनशील क्षेत्रात येत असल्याने वनेत्तर कामे करण्यासाठी त्यास राष्ट्रीय वन्यजीव मंडळाची मान्यता घेणे आवश्यक असुन त्यासोबतच राज्य वन्यजीव मंडळाची मान्यता घेणे आवश्यक आहे. | **प्रकल्पाच्या अंदाजीत खर्चाच्या २% एवढी रक्कम वन्यप्राण्यांच्या वसतीस्थानांचा विकास आणि संरक्षण या कामाकरिता मेळघाट व्याघ्र संवर्धन प्रतिष्ठान कडे जमा करण्याच्या तसेच मुख्य वन्यजीव रक्षक यांनी दिलेल्या अटीसह सदर प्रस्तावाची राष्ट्रीय वन्यजीव मंडळास शिफारस करण्यास्तव या प्रस्तावास मंडळाने मान्यता प्रदान केली.**<br>**यापुढे कोणत्याही प्रकल्पास वन्यजिवांच्या बाबत मान्यता प्राप्त झाल्याशिवाय प्रकल्पाच्या कामास सुरवात करण्यांत येवू नये याबाबत सिंचन/जलसंपदा विभाग तसेच इतर संबंधीत विभागाने नोंद घ्यावी असे निर्देश दिलेत.** |
| २.६ | **अरकचेरी बृहत लघू पाटबंधारे प्रकल्प योजना ता.** | बुलढाणा जिल्हयातील संग्रामपूर तालुक्यामधील सोनाळा, वरखेड, संग्रामपूर, | **प्रकल्पाच्या अंदाजीत खर्चाच्या २% एवढी रक्कम वन्यप्राण्यांच्या वसतीस्थानांचा विकास आणि संरक्षण या कामाकरिता** |

| | | | |
|---|---|---|---|
| | **संग्रामपूर जि. बुलढाणा खाजगी क्षेत्र ३२१.९३ हे.** | कमोद, सालवन, व पिंगळी (ज.) या गावाच्या मालकी क्षेत्रातील ३२१.९३ हे.खाजगी क्षेत्रावर अरकचेरी ब्रहत लघुपाटबंधारे प्रकल्प योजना कार्यान्वीत करावयाची आहे. सदर क्षेत्र मेळघाट व्याघ्र प्रकल्प क्षेत्राचे अधिपत्याखालील अंबाबारवा या अभयारण्याचे सिमेपासून अंदाजे ३.७५ ते ४.५० कि.मी. हवाई अंतरावर असुन प्रकल्पाचे मेळघाट व्याघ्र प्रकल्पाचे अतिसंरक्षित सीमेपासून अंतर ४.२५ ते ४.७५ कि.मी. आहे. प्रकल्पाचे मेळघाट व्याघ्र प्रकल्पाचे बफर सीमेपासून अंतर १.७५ कि.मी. आहे. प्रस्तावित प्रकल्प क्षेत्र अंबाबारवा अभयारण्याचे १०.०० कि.मी. परिसरात येत असून हे क्षेत्र मेळघाट व्याघ्र प्रकल्पाचेही प्रस्तावीत पर्यावरण संवेदनशील क्षेत्रात येत असल्याने वनेत्तर कामे करण्यासाठी त्यास राष्ट्रीय वन्यजीव मंडळाची मान्यता घेणे आवश्यक आहे. | **मेळघाट व्याघ्र संवर्धन प्रतिष्ठान कडे जमा करण्याच्या तसेच मुख्य वन्यजीव रक्षक यांनी दिलेल्या अटीसह सदर प्रस्तावाची राष्ट्रीय वन्यजीव मंडळास शिफारस करण्यास्तव या प्रस्तावास मंडळाने मान्यता प्रदान केली.**<br>**यापुढे कोणत्याही प्रकल्पास वन्यजिवांच्या बाबत मान्यता प्राप्त झाल्याशिवाय प्रकल्पाच्या कामास सुरवात करण्यांत येवू नये याबाबत सिंचन/जलसंपदा विभाग तसेच इतर संबंधीत विभागाने नोंद घ्यावी असे निर्देश दिलेत.** |
| २.७ | **महाराष्ट्रातील सोलापूर-विजापूर या राष्ट्रीय महामार्ग क्रमांक १३ दोनपदरी रस्त्याचे ४ किंवा ६ पदरी विभागलेल्या रूंदिकरण (बाले कि.मी. ००.०० सद्याचे राष्ट्रीय महामार्ग क्रमांक-१ चे कि.मी. २३६/५६० पासून वडाकबाल २७/१८७-सद्याचे कि.मी. १८/४११)** | सदरचा महामार्ग (सोलापूर-बिजापूर राष्ट्रीय महामार्ग क्रमांक १३) पूर्नघटीत माळढोक पक्षी अभयारण्य क्षेत्राचे सिमेपासून १०.०० कि.मी. चे आंत येत असल्याने तसेच जून्या रस्त्याचे नविन नूतनीकरण राष्ट्रीय महामार्ग यांचे मापदंडानुसार होणार असल्याने त्यास राष्ट्रीय वन्यजीव मंडळ तसेच राज्य वन्यजीव मंडळ यांची मान्यता आवश्यक आहे. प्रस्तावित नूतनीकरण करावयाच्या रस्त्याचे अंतर माळढोक पक्षी अभयारण्याचे सिमेपासून कमीत कमी १६७ मीटर व जास्तीत जास्त २५८ मीटर अंतरावर आहे. या कामाकरिता माळढोक पक्षी अभयारण्य क्षेत्रातील वनक्षेत्र किंवा खाजगी क्षेत्राची आवश्यकता नसल्याने व सदर प्रकल्प तेथील विकासात्मक कामाच्या दृष्टीने महत्वाचा असल्याने मुख्य वन्यजीव रक्षकांनी या प्रस्तावाची शिफारस केली आहे. | **माळढोक पक्षी अभयारण्याचे क्षेत्राचा सुसुत्रीकरणाचा प्रस्ताव या मंडळासमोर आहे व त्यामध्ये अभयारण्याचे क्षेत्र कमी करण्याचे प्रस्तावीत आहे. प्रकल्पाच्या अंदाजीत खर्चाच्या २% एवढी रक्कम वन्याप्राण्यांच्या वसतीस्थानांचा विकास आणि संरक्षण या कामाकरिता संबंधीत वन्यजीव विभागाकडे जमा करण्याच्या तसेच मुख्य वन्यजीव रक्षक यांनी दिलेल्या अटीसह सदर प्रस्तावाची राष्ट्रीय वन्यजीव मंडळास शिफारस करण्यास्तव या प्रस्तावास मंडळाने मान्यता प्रदान केली.** |
| २.८ | **महाराष्ट्रातील उस्मानाबाद जिल्हयातील राष्ट्रीय महामार्ग क्रमांक २११ च्या सोलापूर-येडसी या भागाचे एन.एच.डी.पी. फेज-IV सद्याचे दोन पदरी रस्त्याचे रूंदिकरण व सुधारणेसंबंधी येडसी-रामलिंगणनघाट अभयारण्य सिमेपासून १० कि.मी. त्रिज्येत** | प्रकल्प संचालक, भारतीय राष्ट्रीय राजमार्ग प्राधिकरण, प्रोजेक्ट इम्पलिमेंटेशन यूनीट सोलापूर, यांना राष्ट्रीय महामार्ग क्रमांक. २११ चे ०.००० कि.मी. ते १००.००० कि.मी. पर्यन्त रस्त्याचे रुंदीकरण व त्यांची गुणवत्ता सुधारण्याचे काम करावयाचे आहे. या राष्ट्रीय महामार्गातील ६६.००० कि.मी. ते १००.००० कि.मी. हे अंतर येडशी रामलिंगघाट अभयारण्यापासुन १०.०० कि.मी. चे आत पर्यावरण संवेदनशील क्षेत्रातून जात आहे. अभयारण्यापासुन | **याठिकाणी वन्यजीवांच्या दृष्टीने अतिशय महत्वाची असलेली मोठी, जुनी वड, पिंपळ इत्यादि वृक्ष असल्याने त्याचे महत्व लक्षात घेवून अशा वृक्षांची तोड शक्यतो टाळण्यांत यावी यादृष्टिने महामार्ग रूंदिकरणाचे काम करण्यांत यावे. प्रकल्पाच्या अंदाजीत खर्चाच्या २% एवढी रक्कम वन्याप्राण्यांच्या वसतीस्थानांचा विकास आणि संरक्षण या कामाकरिता संबंधीत वन्यजीव विभागाकडे जमा करण्याच्या तसेच मुख्य वन्यजीव रक्षक** |

| | | | |
|---|---|---|---|
| | **येणा-या भागाचे वन्यजीवांच्या दृष्टिने मान्यता देणे.** | कमीतकमी ११८ मी. अंतरावरुन हा राष्ट्रीय महामार्ग जात आहे. सदरच्या प्रस्तावातील कामे ही येडशी रामलिंघाट अभयारण्याच्या सीमे बाहेरील असल्याने व या कामाकरिता अभयारण्य क्षेत्रातील वनक्षेत्र किंवा खाजगी क्षेत्राची आवश्यकता नसल्याने व सदर प्रकल्प तेथील विकासात्मक कामाच्या दृष्टीने महत्वाचा आहे. सदर रस्त्याचे चौपदरीकरण झाल्यास त्यावरुन वाहने भरधाव वेगाने जाणार असल्याने परिसरातील वन्यजीवांवर ध्वनी, व वायू प्रदुषण इत्यादी मुळे दुष्परिणाम होण्याची शक्यता आहे. तसेच वन्यप्राण्याचा अपघातही होण्याची शक्यता आहे. त्यामुळे वन्यप्राण्याच्या सुरक्षा व अधिवास संवर्धनासाठी काही अटी व शर्तीवर सदरचे प्रस्तावाची मुख्य वन्यजीव रक्षकांनी शिफारस केली आहे. | **यांनी दिलेल्या अटीसह सदर प्रस्तावाची राष्ट्रीय वन्यजीव मंडळास शिफारस करण्यास्तव या प्रस्तावास मंडळाने मान्यता प्रदान केली.** |
| २.९ | **माळढोक पक्षी अभयारण्याच्या पर्यावरण संवेदनशील क्षेत्रातून राष्ट्रीय महामार्ग क्र. ९ (कि.मी. २४९.००० ते कि.मी. २५५.०००)चे व सोलापूर येडसी भागातील राष्ट्रीय महामार्ग क्रमांक २११ चे कि.मी. ०.००० ते १००.०० कि.मी. चे २/४ लेन मध्ये नूतनीकरण व मजबूती करणे)** | सदरचा महामार्ग सोलापूर-हैद्राबाद राष्ट्रीय महामार्ग क्रमांक ०९ हा पूर्नघटीत माळढोक पक्षी अभयारण्य क्षेत्राचे सिमेपासून १० कि.मी. चे आंत येत असल्याने तसेच जून्या रस्त्याचे नविन नूतनीकरण राष्ट्रीय महामार्ग यांचे मापदंडानुसार होणार असल्याने त्यास राष्ट्रीय वन्यजीव मंडळ तसेच राज्य वन्यजीव मंडळ यांची मान्यता आवश्यक आहे. प्रस्तावित नूतनीकरण करावयाच्या रस्त्याचे अंतर माळढोक पक्षी अभयारण्यातील डोनगांवचे सिमेपासून ७.०० कि.मी. व कोंढी या गावाचे सिमेपासून १०.०० कि.मी. अंतरावर आहे. या कामाकरिता माळढोक पक्षी अभयारण्य क्षेत्रातील वनक्षेत्र किंवा खाजगी क्षेत्राची आवश्यकता नाही आणि त्या क्षेत्रात वन्यजीवाचा आढळ असल्याचे दिसून आलेले नाही. हे क्षेत्र अपघात प्रवण क्षेत्र असल्याने व या ठिकाणी मानवी अपघात होण्याचे प्रमाण जास्त असल्याने सदर रस्त्याचे रुंदीकरण व नूतनीकरण करणे अत्यंत आवश्यक आहे. सदर प्रकल्प तेथील विकासात्मक कामाच्या दृष्टीने महत्वाचा असल्याने काही शर्ती व अटीवर मुख्य वन्यजीव रक्षकांनी शिफारस केली आहे. | **प्रकल्पाच्या अंदाजीत खर्चाच्या २% एवढी रक्कम वन्याप्राण्यांच्या वसतीस्थानांचा विकास आणि संरक्षण या कामाकरिता संबंधीत वन्यजीव विभागाकडे जमा करण्याच्या तसेच मुख्य वन्यजीव रक्षक यांनी दिलेल्या अटीसह सदर प्रस्तावाची राष्ट्रीय वन्यजीव मंडळास शिफारस करण्यास्तव या प्रस्तावास मंडळाने मान्यता प्रदान केली.** |
| २.१० | **वसई खाडी, वर्सोवा गाव, जि. ठाणे येथे अल्ट्राटेक या कंपनीव्दारे उभारण्यात येत असलेल्या बल्क** | ठाणे जिल्हयातील वसई तालुक्यामधील वर्सोवा गावांच्या मालकी सर्व्हे क्र. ७, ८ व ९ (भाग) येथे औद्योगीक वसाहतीमध्ये अल्ट्राटेक या कंपनीव्दारे उभारण्यात येत असलेल्या बल्क सिमेंट टर्मीनल व जेट्टीचे बांधकामाकरीता १.१४ हे. खाजगी क्षेत्राची | **मंडळाचे काही सदस्यांनी या प्रकल्पामुळे वन्यजीवांचे अधिवास व त्यांचे भ्रमणमार्गावर परिणाम होईल अशी शक्यता वर्तविल्याने मंडळाने या प्रस्तावास मान्यता नाकारली.** |

| | | | |
|---|---|---|---|
| | **सिमेंट टर्मीनल व जेट्टी बांधकामाबाबत.** | आवश्यकता असुन सदरचे प्रस्तावीत क्षेत्र हे संजय गांधी राष्ट्रीय उद्यान क्षेत्रापासुन १५० मी. अंतरावर आहे. हे क्षेत्र संजय गांधी राष्ट्रीय उद्यानाचे प्रस्तावीत पर्यावरण संवेदनशील क्षेत्रात येत असल्याने वनेत्तर कामे करण्यासाठी त्यास वन्यजीव मंडळाची मान्यता घेणे आवश्यक आहे. मुख्य वन्यजीव रक्षकांनी या प्रस्तावाची शिफारस केली आहे. | |
| २.११ | **बोर व नविन बोर अभयारण्याचे सीमेपासून १०.०० कि.मी. चे आत नैसर्गिक गॅस पाईप लाईन टाकणेबाबत.** | गुजरात राज्य पेट्रोनेट लिमीटेड (GSPL), इंडियन ऑईल कार्पोरेशन लिमीटेड (IOCL), भारत कार्पोरेशन लिमीटेड (BPCL), आणि हिदुस्थांन पेट्रोलियम कार्पोरेशन लिमीटेड (HPCL) यांच्या संयुक्त विद्यमाने जी आय टी एल (GITL) ही भारत देशातील अशी प्रथम कंपनी आहे की जी नैसर्गिक गॅस निर्मीती करून ती सर्व सामान्यांना उपलब्ध करून देत आहे. सदर कंपनी ही देशातील राजस्थान मध्यप्रदेश महाराष्ट्र आणि आंध्रप्रदेश या राज्यातील एकूण २६ जिल्हयातील असंख्य ग्राहकांना पाईप लाईन द्वारे नैसर्गिक गॅस पुरवणार आहे. सदर भूमिगत नैसर्गिक गॅस लाईनची लांबी ही अंदाजे १७४६ कि.मी. असून तीचे जाळे मल्लावरम-भोपाल-भिलवाडा-विजयपूर इत्यादी ठिकाणी पसरलेले आहे. व या कामाकरिता अंदाजे रू. ५७३५ कोटी इतका खर्च अपेक्षीत आहे. प्रस्तावित भूमिगत नैसर्गिक गॅस पाईप लाईन मूळे वाहतूकीचा खर्च कमी होणार असून धोक्याचे प्रमाण फारच अत्यल्प राहणार असुन आर्थीक व पर्यावरणीय दृष्टीकोणातून सुरक्षित राहील.<br>सदर प्रस्तावित नैसर्गिक गॅस पाईप लाईनचे अंतर हे बोर व नविन बोर अभयारण्याचे सिमेपासून अंदाजे १.८० कि.मी. असुन बोर व नविन बोर अभयारण्याचे १०.०० कि.मी. परिसरात येते. हे क्षेत्र बोर व नविन बोर अभयारण्याचे प्रस्तावीत पर्यावरण संवेदनशील क्षेत्रात येत असल्याने वनेत्तर कामे करण्यासाठी त्यास राष्ट्रीय वन्यजीव मंडळाची मान्यता घेणे आवश्यक असुन त्यासोबतच राज्य वन्यजीव मंडळाची मान्यता घेणे आवश्यक आहे. मुख्य वन्यजीव रक्षकांनी या प्रस्तावाची शिफारस केली आहे. | **या प्रकल्पाचे राष्ट्रीय महत्व लक्षात घेता प्रकल्प यंत्रणेकडून या प्रकल्पास अंदाजे रूपये ९९ कोटीचा खर्च अपेक्षीत असल्याचे सांगण्यांत आल्याने प्रकल्पाच्या अंदाजीत खर्चाच्या २% एवढी रक्कम पेंच व्याघ्र संवर्धन प्रतिष्ठान यांचेकडे जमा करण्याचे निर्देश मंडळाने दिलेत. सदर प्रस्तावाची राष्ट्रीय वन्यजीव मंडळास शिफारस करण्यास्तव या प्रस्तावास मंडळाने मान्यता प्रदान केली.<br>भविष्यात बोर व्याघ्र संवर्धन प्रतिष्ठान स्थापन झाल्यास सदरचा निधी त्या प्रतिष्ठानाकडे वळती करण्याचे निर्देश मंडळाने दिले.** |
| २.१२ | **मौ. रामडोंगरी, ता. सावनेर येथील स.क्र. १०१,१०२,१०५ व** | प्रस्तावीत खाणीचे क्षेत्र हे नागपूर वनविभागातील खापा वनपरिक्षेत्रातील मौ. रामडोंगरी या गावाअंतर्गत संरक्षीत वनखंड क्र. २१३ मध्ये येत असून सदर खाणी | **सदर क्षेत्र वन्यप्राण्यांचे व्यवस्थापनेचे दृष्टिने महत्वाचे असल्याने व वन्यजीवांच्या भ्रमणमार्गात अडथळे येण्याची शक्यता असल्याने मंडळाने या प्रस्तावास मान्यता** |

| | | | |
|---|---|---|---|
| | **१०६ संरक्षीत वनक्षेत्रामधील ६१.४५ हेक्टर मे. जयस्वाल निको इंडस्ट्रिज लिमी. नागपूर यांचा मॅगनीज खदानी करीता वनजमीनीचा प्रस्ताव** | करीता ६१.४५ हे. क्षेत्राची आवश्यकता आहे. प्रस्तावीत खाणकाम हे मानसिंगदेव अभयारण्याच्या सीमेबाहेर आहे. पेंच राष्ट्रीय उद्यान व मानसिंगदेव अभयारण्य यांचे प्रस्तावीत पर्यावरण संवेदनशील क्षेत्राचे बाहेर येत असले तरी ते क्षेत्र मानसिंगदेव अभयारण्याचे १० कि.मी. परीसरात येते. सदरचे अभयारण्या सभोवतालचे १० कि.मी. ची सिमा ही मानीव पर्यावरण संवेदनशील क्षेत्र असल्याने व केंद्र शासनाच्या पर्यावरण व वन मंत्रालयाने दि. ०९/०२/२०११ रोजी जाहीर केलेल्या मार्गदर्शक सूचना नुसार खाणकामाचे क्षेत्र हे प्रतिबंधीत वर्गवारीत मोडते. या कामाकरिता अभयारण्य क्षेत्रातील वनक्षेत्र किंवा खाजगी क्षेत्राची आवश्यकता नाही. खाणीचे क्षेत्र कन्हान नदीच्या किना-यावर असून नदी पात्रातील पाण्याचा उपयोग त्या क्षेत्रातील वन्यजीव पिण्याच्या पाण्याकरीता करीत असतात. तसेच त्या क्षेत्रात वन्यप्राण्याची ये-जा सतत चालू असते. खाणकामामुळे सदरचे संरक्षीत क्षेत्र नष्ट होणार असून त्यामुळे कन्हान नदी व त्या परीसरातील वन्य प्राणी व वन्यप्राण्यांचा स्थलांतरीत मार्ग यावर विपरीत परिणाम होणार असून खाणकामाचा त्रास होणार आहे. त्यामूळे सदर प्रकल्प तेथील विकासात्मक कामाच्या दृष्टीने महत्वाचा नाही.<br>सदर खाणकाम प्रकल्प सदर क्षेत्रात झ ााल्यास परिसरातील वन्यजीवांवर ध्वनी, हवा, वायू, प्रदुषण इ. मुळे दुष्परिणाम होण्याची शक्यता आहे. तसेच वन्यप्राण्यांचा अपघात होण्याची शक्यता नाकारण्यात येत नाही. त्यामुळे वन्यप्राण्याची सुरक्षा व अधिवास संवर्धनाचे हित व निकड लक्षात घेता प्रस्तावाची शिफारस नाकारण्यात येत आहे. | **नाकारली.** |
| २.१३ | **मौ. मालाड कुरार व्हिलेज आप्पापाडा रोडच्या कडेने पाईपलाईन टाकणेबाबत बृहन्मुंबई महानगर पालिकेचा प्रस्ताव क्षेत्र ०.०४५ हे.** | संजय गांधी राष्ट्रीय उद्यानातील मौ. मालाड कुरार व्हिलेज आप्पापाडा रोडच्या कडेने पाईपलाईन टाकणेबाबत बृहन्मुंबई महानगर पालिकेचा प्रस्ताव अपर प्रधान मुख्य वनसंरक्षक (वन्यजीव) पश्चिम मुंबई यांचे कडून प्राप्त झालेला आहे. प्रस्तावीत पाईप लाईन टाकणे करीता संजय गांधी राष्ट्रीय उद्यानाच्या मौ. मालाड राखीव वन सर्व्हे क्र. २३९/१ येथील ३६० मीटर लांब x १.२५ मीटर रुंद अशा एकूण ०.०४५ हे. क्षेत्राची आवश्यकता असून भूमिगत पाईप लाईन टाकून झाल्यानंतर सदर क्षेत्र पूर्ववत सपाट करुन घेण्याचे अटीवर कामास | **मुंबई महानगराच्या जनतेच्या पीण्याच्या पाण्याच्या दृटीने सदरच्या प्रकल्पाचे महत्व लक्षात घेता , रस्त्याच्या कडेनेच भूमिगत पाईप लाईन टाकण्यांत येत असल्याने व वन्यप्राण्यांच्या संचारास बाधा पोहोचणार नसल्याने या प्रकल्पास प्रकल्पाच्या अंदाजीत खर्चाच्या २% एवढी रक्कम वन्याप्राण्यांच्या वसतीस्थानांचा विकास आणि संरक्षण या कामाकरिता संबंधीत वन्यजीव विभागाकडे/ संजय गांधी राष्ट्रीय उद्यान कडे जमा करण्याच्या तसेच मुख्य वन्यजीव रक्षक यानी दिलेल्या अटीसह सदर प्रस्तावाची राष्ट्रीय वन्यजीव मंडळास** |

| | | | |
|---|---|---|---|
| | | मंजूरी मिळण्यास या कार्यालयाची शिफारस करण्यात येत आहे. सदर क्षेत्रात पाईप लाईन टाकून झाल्यानंतर त्या क्षेत्राचा राखीव वनाचा दर्जा बदलणार नसून त्यावर संजय गांधी राष्ट्रीय उद्यान विभागाची मालकी राहील. | **शिफारस करण्यास्तव या प्रस्तावास मंडळाने मान्यता प्रदान केली.** |

## विषय क्रमांक - ३ :- नविन अभयारण्य / व्याघ्र प्रकल्प अधिसूचित झाल्याचे मंडळ सदस्याच्या निदर्शनास आणणे.

| अक्र | मुद्दा | झालेली चर्चा व घेतलेले निर्णय | केलेली कार्यवाही |
|---|---|---|---|
| **३.१** | **ताम्हिणी अभयारण्य** | राज्य शासनाने दि. ०३/०५/२०१३ अन्वये ४९.६२ चौ.कि.मी. क्षेत्राची अधिसूचना जारी केली आहे. | **या बाबत मंडळाने वन विभागाचे अभिनंदन केले.** |
| **३.२** | **कोका अभयारण्य** | राज्य शासनाने दि. १८/०७/२०१३ अन्वये १००.१३ चौ.कि.मी. क्षेत्राची अधिसूचना जारी केली आहे. | **या बाबत मंडळाने वन विभागाचे अभिनंदन केले.** |
| **३.३** | **नवेगांव-नागझिरा व्याघ्र प्रकल्प** | राज्य शासनाने दि. १२/१२/२०१३ अन्वये ६५६.३६ चौ.कि.मी. क्षेत्राची अधिसूचना जारी केली आहे. | **या बाबत मंडळाने वन विभागाचे अभिनंदन केले.** |

## विषय क्रमांक - ४ - अ :- नविन अभयारण्य / संवर्धन राखीव / व्याघ्र प्रकल्प प्रस्ताव मंडळाच्या अवलोकनार्थ तथा शिफारशीस्तव पटलावर ठेवणे

| अक्र | मुद्दा | बैठकीत दिलेली माहिती | झालेली चर्चा व घेतलेले निर्णय |
|---|---|---|---|
| **४अ.१** | **ममदापूर संवर्धन राखीव ता. येवला जि. नाशिक** | नाशिक वनवृत्तातील पूर्व भाग नाशिक वनविभागा अंतर्गत येवला या वनपरिक्षेत्रात मौ. राजापूर, सोमठाणजोश ममदापूर, खरवंडी व देवदरी येथील राखीव वनाचे ५४.५४ चौ.कि.मी. क्षेत्र वन्यजीव (संरक्षण) अधिनियम १९७२ चे सुधारणा कायदा २००२ मधील कलम - ३६ अ नुसार संवर्धन राखीव (Conservation Reserve) म्हणून अधिसूचित करण्याचा प्रस्ताव सादर करण्यात येत आहे.<br>प्रस्तावित क्षेत्र नाशिक जिल्हयातील पूर्व भाग नाशिक वनविभागात समाविष्ट असून त्याचा परिस्थितीकीय, प्राणी, | **या प्रकल्पाचा निर्णय मा. पालकमंत्री नाशिक यांचेशी चर्चा करून मान्यता देण्याचे ठरले.** |

| | | | |
|---|---|---|---|
| | | वनस्पतीविषयक असलेल्या कारणासाठी व त्याक्षेत्रात प्रामुख्याने काळविट हे वन्यप्राणी आढळून येत आहे. त्यांचे व जैवविविधतेचे रक्षणकरण्याच्या दृष्टीने सदरहू क्षेत्र संवर्धन राखीव (Conservation Reserve) अधिसूचीत करण्याचा प्रस्ताव शासनास दि. २८/०१/२०१४ रोजी सादर करण्यात आलेला आहे. ही माहिती मंडळाच्या पटलावर ठेवण्यात येत आहे. | |
| ४अ.२ | **बोर व्याघ्र प्रकल्प क्षेत्र १३८.१२ चौ. कि. मी. जि. नागपूर / वर्धा** | नागपूर वनवृत्तातील व वर्धा वनविभागातील बोर अभयारण्य व नविन बोर अभयारण्य क्षेत्रा व्यतिरीक्त १६.३२ चौ.कि.मी. अतिरीक्त राखीव वनक्षेत्र व इतर क्षेत्र असे एकुण १३८.१२ चौ.कि.मी. संपूर्ण क्षेत्र वन्यजीव (संरक्षण) अधिनियम १९७२ मधील कलम ३८ V (१) अन्वये व्याघ्र राखीव क्षेत्र (Tiger Reserve) म्हणून अधिसूचित करण्याचा प्रस्ताव शासनास सादर करण्यात आला आहे.<br>प्रस्तावित क्षेत्र नागपूर/वर्धा जिल्हयातील नागपूर / वर्धा वनविभागात समाविष्ट असून त्याचा परिस्थितीकीय, प्राणी, वनस्पतीविषयक असलेल्या कारणासाठी व त्याक्षेत्रात प्रामुख्याने वाघ व अनुसूची - I मधील इतरही महत्वाचे वन्यप्राणी आढळून येत आहे. त्यांचे व जैवविविधतेचे रक्षणकरण्याच्या दृष्टीने सदरहू क्षेत्र व्याघ्र प्रकल्प (Tiger Reserve) अधिसूचीत करण्याचा प्रस्ताव<br>शासनास दि. २७/०१/२०१४ रोजी सादर करण्यात आलेला आहे.<br>तत्कालीन मा. वन व पर्यावरण राज्यमंत्री (स्वतंत्र कार्यभार) यांनी बोर येथे व्याघ प्रकल्प व्हावा असे मत व्यक्त केले होते. | **नागपूर व वर्धा जिल्हयातील बोर अभयारण्य व नविन बोर अभयारण्य क्षेत्रा व्यतिरीक्त १६.३२ चौ.कि.मी. अतिरीक्त राखीव वनक्षेत्र व इतर क्षेत्र यांचे बोर विस्तारीत अभयारण्य घोषीत करून एकूण १३८.१२ चौ.कि.मी. संपूर्ण क्षेत्र वन्यजीव (संरक्षण) अधिनियम १९७२ मधील कलम ३८ व्ही (१) अन्वये व्याघ्र प्रकल्प क्षेत्र (Tiger Reserve) म्हणून अधिसूचित करण्याचे प्रस्तावास मान्यता प्रदान करण्यांत आली.** |

## विषय क्रमांक - ४ - ब :- अभयारण्य क्षेत्र कमी करणेबाबत

| | | | |
|---|---|---|---|
| ४ब.१ | **माळढोक पक्षी अभयारण्य जि. सोलापूर** | रिट अर्ज (दिवाणी) क्र. २०२ / १९९५ मधील वादकालीन अर्ज (I.A.) क्र. ५४८ (सन २००५ मधील) व वादकालीन अर्ज (I.A.) क्र. १४८३ मध्ये मा. सर्वोच्च न्यायालयाने आदेश पारित करुन इतर गोष्टींबरोबर माळढोक पक्षी अभयारण्याच्या सीमांचे सुसूत्रीकरण करण्याचे निर्देश राज्य शासनास दिले.<br>महाराष्ट्र शासनाने मा. सर्वोच्च न्यायालयाच्या निर्देशांच्या अंमलबजावणीसाठी शासन निर्णय, महसूल व वनविभाग, क्रमांक एस-३०/२००६/सी.आर.१५८/एफ-१० दि. | **या प्रस्तावातील सुसुत्रीकरणाचा वन्यजीव तज्ञांनी केलेला अभ्यास विचारात घेवून तसेच मंडळासमोर मुख्य वनसंरक्षक (वन्यजीव) पुणे यांनी सादरीकरणाद्वारे दिलेली माहिती व त्यावर झालेल्या सखोल चर्चेअंती प्रत्यक्षात क्षेत्र वगळल्यानंतर ताळमेळ करून माळढोक पक्षी अभयारण्याचे क्षेत्र ३६६.३७ वर्ग कि.मी. एवढे क्षेत्र ठेवण्यास मंडळाने मान्यता प्रदान केलेली आहे.**<br><br>**चंद्रपूर जिल्हयामध्ये माळढोक पक्ष्यांचे** |

| | | | |
|---|---|---|---|
| | | ०९/०१/२००७ अन्वये श्री. व्ही.बी.सावरकर यांच्या अध्यक्षतेखाली उक्त माळढोक पक्षी अभयारण्याच्या सुसूत्रीकरणासाठी तज्ञ समिती गठित केली; आणि सदर तज्ञ समितीने त्यांचा अहवालाचे अनुषंगाने मुख्य वन्यजीव रक्षक यांचे शिफारशीवरुन महाराष्ट्र शासनाने ऑगस्ट, २००८ मध्ये वा. सर्वोच्च न्यायालयात वादकालीन अर्ज (I.A.) क्र. २३४२ / २००८ प्रकरणी आदेशास्तव दाखल केला अर्जावर दि. २०/१०/२००८ रोजी सुनावणीनंतर मा. सर्वोच्च न्यायालयाने केंद्रीय वन व पर्यावरण मंत्रालयांने राष्ट्रीय उद्याने व अभयारण्य सीमा सुसूत्रीकरण समितीच्या शिफारशीनुसार उक्त अभयारण्याच्या सीमेचे सुसूत्रीकरण अंतिमरित्या करण्याचा निर्णय दिला.<br>मुख्य वनसंरक्षक (वन्यजीव) पुणे यांनी मंडळासमोर सादरीकरण केले त्यावेळी सदरचे क्षेत्र विविध प्रकारचे खाजगी उपयोगाखाली असल्याचे निदर्शनास आणून दिले. स्थानिक जनतेची प्रतिक्रीया व काही भागात जनतेचा रोष लक्षात घेता व्यवहारीक दृष्टीकोनातून सदरचे क्षेत्र अभयारण्यातून वगळणे संयुक्तीक राहील. | **अस्तित्व आढळून आल्याने त्याठिकाणी या अतिदुर्मिळ पक्ष्यांचे संवर्धन करावे व त्याचे अधिवासास सुरक्षीतता मिळावी म्हणून आवश्यक कार्यवाही योजावी.**<br><br>**तसेच महाराष्ट्र राज्यात राष्ट्रीय माळढोक प्रजनन केंद्र उभारण्यासाठी उपयुक्त जागा उपलब्ध करून देण्यास तसेच प्रजनन केंद्राकरिता पुढील १५ वर्षाकरिता लागणा-या निधीमध्ये राज्य शासनाचे योगदान देणेबाबत हमी केंद्र शासनाकडे पाठविण्यांस मंडळाने मान्यता दिली.**<br>**जेवढे क्षेत्र माळढोक पक्षी अभयारण्यातून कमी करण्यांत येणार आहे तेवढेच क्षेत्र इतर वनक्षेत्रात संरक्षीत वनक्षेत्र (वन्यजीव अभयारण्य म्हणून) घोषीत करण्याचे अटिवर मंडळाने मान्यता प्रदान केलेली आहे.** |

## विषय क्रमांक ५- साप चावल्यानंतर नुकसान भरपाई देण्याबाबत

| अक्र | मुद्दा | बैठकीत दिलेली माहिती | झालेली चर्चा व घेतलेले निर्णय |
|---|---|---|---|
| **५.१** | **साप चावल्यानंतर नुकसान भरपाई देण्याबाबत** | वन्यप्राण्याच्या हल्ल्यात सानुग्रह अनुदाना करिता शासन निर्णय डब्लुएलपी १००८/प्र.क्र.२७०/फ-१ दि. ०२/०७/२०१० अन्वये अर्थसहाय्य देण्यात येते. परंतू सन २०१३ चे पहिले अर्थसंकल्पीय अधिवेशनातील आश्वासन क्र. ४००. बाबत विधान परिषदेत विधानसभा कामकाज खंड १६५ क्र. २१ दिनांक १५/०४/२०१३ रोजी मा. उपाध्यक्ष यांनी खालील प्रमाणे मत व्यक्त केले त्यावर मा. मंत्री (वने) यांनी योग्य विचार करण्यात येईल, असे सन्माननिय सदस्यांना आश्वासन दिले होते.<br><br>दि. ०७/०६/२०१२ रोजी राज्य वन्यजीव मंडळाचे ६ व्या बैठकीत सर्पदंशामुळे होणारे मणुष्य हानी बाबत नुकसान भरपाई देण्याचा प्रस्ताव अमान्य करण्यात आला. त्याबाबत विस्तृत चर्चेमध्ये खालील मुद्यांचा विचार करण्यात आला होता.<br>साप हा प्राणी शहरी/ग्रामिण/शेती क्षेत्रात देखील आढळून येतो. सर्पदंश हा किती लोकांना झालेला आहे त्यासंबंधीची संपूर्ण माहिती | **या विषयावर विधान सभा/परिषदेमध्ये सभासदांद्वारे मांडण्यांत येणा-या प्रश्नांच्या माध्यमातून होणारी चर्चा त्यावर शासनातर्फे देण्यांत आलेली आश्वासने याचा सखोल विचार करण्यांत आला. प्रत्यक्ष वनक्षेत्रात सर्पदंशामुळे झालेल्या मन्युष्याच्या जिवीतहानीस सानुग्रह अनुदान म्हणून रूपये १.०० लक्ष एवढी रक्कम कायदेशीर वारसास अदा करण्यांस मान्यता प्रदान करण्यांत आली.** |

| | | | |
|---|---|---|---|
| | | ठेवण्यासाठी वन विभागाकडे एवढा कर्मचारी वर्ग उपलब्ध नाही त्यामुळे अशा प्रकरणांचे नियोजन करणे वन विभागास शक्य होणार नाही अशी माहिती देण्यांत आली. तसेच **पश्चिम बंगाल शासनातर्फे या बाबींकरिता सानुग्रह अनुदान म्हणून रूपये १.०० लक्ष एवढी रक्कम देण्यांत येते ही बाब सुध्दा कळविण्यांत आली.** | |
| **<u>विषय क्रमांक - ६</u> :- मंडळाच्या सदस्यांनी सूचविलेले मुद्दे** | | | |
| ६.१ | **राज्यातील मानव-वन्यप्राणी संघर्षग्रस्त क्षेत्रांमध्ये विशेष आर्थिक योजना लागू करणे.** | शासन निर्णय क्रमांक डब्लूएलपी २०१२/प्र.क्र.३३७/फ-१ दि. ३०/०३/२०१३ नुसार वन्यप्राण्यांचे हल्ल्यात मानवी मृत्यू झाल्यास किंवा अपंगत्व आल्यास किंवा गंभीर जखमी झाल्यास देण्यात येणारे सानुग्रह अनुदान रकमेत वाढ करण्यात आलेली आहे. तसेच शासन निर्णय क्र. डब्लूएलपी २०१२/प्र.क्र.३२६/फ-१ दि. ०५/०९/२०१३ अन्वये वन्यप्राण्यांच्या हल्ल्यामुळे शेतपीक/फळबाग नुकसानीसाठी अर्थ सहाय्य तरतूद रकमेत वाढ करण्यात आलेली आहे. मंत्रीमंडळाच्या निर्णयानुसार शेतपीकांच्या तसेच फळबागांची नुकसान भरपाई देण्यासाठी तत्कालीन प्रधान मुख्य वनसंरक्षक (वन्यजीव) यांच्या अध्यक्षतेखाली नेमलेल्या समितीने जो अहवाल शासनास सादर केलेला आहे | **मंडळाने समितीचा अहवाल व सादरीकरणास मान्यता दिली. समितीच्या अहवालातील शिफारसी लक्षात घेवून संघर्ष कमी करण्याबाबत सादरीकरण करण्यांत आले. शिफारींप्रमाणे कार्यवाही करण्यांत यावी असे निर्देश मंडळाच्या अध्यक्षांनी दिलेत.**<br>**प्रारूप शासन निर्णय प्रधान मुख्य वनसंरक्षक (वन्यजीव) देतील.** |
| ६.२ | **पाटबंधारे विभागाने प्रकल्प उभारणेच्या वेळी बांधलेल्या इमारती वन विभागास हस्तांतरीत करणेबाबत.** | मंडळाच्या सदस्यांनी या इमारती वन जमिनीवर बांधण्यांत आलेल्या असल्याने व सद्यस्थितीत त्या इमारती वापरात नसल्याने वन विभागास हस्तांतरीत करण्याविषयी चर्चा झाली. | **प्रकल्प पूर्ण झालेला असल्याने अनेक इमारती आता पाटबंधारे विभागाकडून उपयोगात येत नाहीत. अशा इमारती/वसाहती निर्मनुष्य आहेत यास्तव या इमारती/वसाहती वन विभागास हस्तांतरीत करण्यांत याव्यात असे निर्देश मा. मुख्यमंत्री तथा मंडळाचे अध्यक्षांनी दिलेत.** |
| ६.३ | **प्रकल्प उभारण्याचे वेळी पाटबंधारे विभागाने ताब्यात घेतलेले परंतु सद्यस्थितीत वापरात / आवश्यकता नसलेले वनक्षेत्र वन विभागास परत करणे बाबत.** | पाटबंधारे विभागाकडून प्रकल्प उभारणीचे वेळी वनक्षेत्र ताब्यात घेण्यांत येते. प्रकल्प पूर्णत्वास नेल्यानंतर काही वनक्षेत्र उपयोगाविना पाटबंधारे विभागाकडे शिल्लक राहते व ते कोणत्याही उपयोगात येत नसल्याने सदरचे वनक्षेत्र वन विभागाकडे हस्तांतरीत करण्यांत यावे जेणेकरून सदरच्या क्षेत्राचे संरक्षण व विकासात्मक कामासाठी उपयोग होईल हा मुद्दा चर्चा करण्यांत आला. | **पाटबंधारे विभागाच्या उपयोगात न येणारे वनक्षेत्र वन विभागास हस्तांरीत करण्यांत यावे असे निर्देश मा. मुख्यमंत्री तथा मंडळाचे अध्यक्षांनी दिलेत.** |
| ६.४ | **वन्यप्राण्यांच्या दृष्टीने पिण्याच्या पाण्याचा वापर** | पाटबंधारे विभागाने शासन निर्णय क्रमांक बैठक-१०९६/८६१/(१८८/९६) जसंनि, दिनांक ३० जुलै १९९७ द्वारे पिण्याचे पाणी | **१. वन्यप्राण्यांसाठी पिण्याचे पाणी राखीव ठेवणे ही बाब महत्वाची असल्याने मंडळाने यास सहमती दर्शविली व** |

| | | | |
|---|---|---|---|
| | | पुरवठयासाठी अग्रक्रमाणे पाणी राखुन ठेवण्याबाबत निर्देश दिलेले आहेत. पिण्याच्या पाण्याचे आरक्षण वाढविण्यासाठी शासनाने उपरोक्त शासन निर्णयात १०% वरून १५% करून जास्त पाणी पिण्यासाठी आरक्षीत करण्याची तरतुद आहे. या शासन निर्णयामध्ये जो अग्रक्रम दिलेला आहे त्यामध्ये<br>१. पिण्याचे पाणी - १५%<br>२. उद्योग - १०%<br>३. सिंचन - उर्वरीत<br>असे नमूद आहे. याच धर्तीवर वनालगत किंवा वन्यप्राण्यांचा वावर असलेल्या वनक्षेत्रात वन्यजीवांसाठी प्राधान्याने पाणी देण्याची तरतुद असावी यावर चर्चा करण्यांत आली. | **ज्याठिकाणी मानव वन्यजीव संघर्ष मोठया प्रमाणात आहेत त्या क्षेत्रातील धरणांमध्ये वन्यजीवांसाठी अग्रक्रमाने पाणी राखुन ठेवावे असे निर्देश दिलेत. त्यामुळे वन्यप्राणी, पाण्याच्या अनुपलब्धतेमुळे मानवी क्षेत्रात किंवा शेतांमध्ये पाण्यासाठी भटकंती करणार नाहीत आणि यामुळे मानव -वन्यजीव संघर्षास काही प्रमाणात आळा बसेल.**<br>**२. धरणांच्या बांधकामामुळे खालच्या बाजुला जी नदी किंवा नाला वाहतो त्यातील पाणी उन्हाळयात वाहत नाही व त्यामुळे वन्यप्राण्यांना धरण बांधल्यानंतर पिण्यासाठी पाणी उपलब्ध होत नाही. यास्तव मानव वन्यजीव संघर्षात वाढ होते म्हणून धरणास कोणतीही बाधा न होता नदी किंवा नाल्याचा वन्यप्राण्यांच्या गरजेप्रमाणे किमान २% प्रवाह चालु राहील याची व्यवस्था पाटबंधारे विभागाने करावी. मा. अध्यक्षांनी जैविक संरचनेचे संरक्षणा करिता आर्थिक बोझा वहन करणे जरूरी असल्याचे धोरण संबंधीत प्रकल्पास सुनिश्चित करण्यासाठी निर्देश दिलेत. सचिव पाटबंधारे यांनी शासन निर्णय क्रमांक बैठक-१०९६/८६१/(१८८/९६) जसंनि, दिनांक ३० जुलै १९९७ मध्ये सुधारणा करून २% पाणी तरी जीवंत ठेवणे व वन्यजीवांकरिता सोडणे बाबत तरतुद करावी.** |
| | | | |

## <u>विषय क्रमांक ७</u> - अध्यक्षांच्या परवानगीने वेळेवर येणारे विषय

उपस्थितांनी वेळेवर मा. अध्यक्षांच्या परवानगीने खालील प्रमाणे विषय प्रस्तुत केले. त्यावर देण्यांत आलेली माहिती, झालेली चर्चा व घेतलेले निर्णय खालील प्रमाणे आहेत.

| अ.क्र. | मुद्दा | बैठकीत दिलेली माहिती | झालेली चर्चा व घेतलेले निर्णय |
|---|---|---|---|
| ७.१ | **जळगांव जिल्हयातील वडोदा वनपरिक्षेत्रात मुक्ताई भवानी संवर्धन राखीव म्हणून घोषीत करणेबाबत** | धुळे वनवृत्तातील जळगांव वनविभागातंर्गत वडोदा या वनपरिक्षेत्रात मौ. चारठाणा, वायला, चिंचखेडा, नांदवेल, डोलारखेडा, सुकळी, दुई, धाबे, मोरझिरा, राजुरा, जोधनखेडा, वडोदा, हलखेडा, बहाद्दरपूर, दौलतपूर, मधापुरी, महालखेडा, टाकळी, खामणी, अंजनगाव, रामगड, पिंपरीपंचम, पुर्नाड, येथील राखीव वनाचे १२२.७४ चौ.कि.मी. क्षेत्र वन्यजीव (संरक्षण) अधिनियम १९७२ चे सुधारणा कायदा | **या प्रस्तावास मंडळाने मान्यता प्रदान केली.** |

| | | | |
|---|---|---|---|
| | | २००२ मधील कलम - ३६ अ नुसार "मुक्ताई भवानी" संवर्धन राखीव (Conservation Reserve) म्हणून अधिसूचित करण्याचा प्रस्ताव सादर करण्यात येत आहे.<br>प्रस्तावित क्षेत्र जळगांव जिल्हयातील वनविभागात समाविष्ट असून त्यास परिस्थितीकीय, प्राणी,वनस्पतीविषयक असलेल्या कारणासाठी विशेष संरक्षण देणे आवश्यक आहे. या क्षेत्रात प्रामुख्याने वाघ, बिबट, काळविट, इत्यादी प्राणी व मोर, हरीयल इत्यादी विविध प्रकारचे पक्षी आढळून येतात. या जैवविविधतेचे रक्षण करण्याच्या दृष्टीनेसदर क्षेत्र संवर्धन राखीव (Conservation Reserve) घोषित करण्याची शिफारसदि. १८-०२-२०१४ चे पत्रान्वये शासनास करण्यात आलेली असून प्रस्ताव राज्य वन्यजीव मंडळाचे अनुमोदनार्थ व विचारार्थ ठेवण्यात येत आहे. | |
| ७.२ | Widening of existing 2 lane road to 4 lane divided carriage configuration for Panvel-Indapur (Km 0.000 to Km. 84.000) section of NH - 17 in the State of Maharashtra. Proposal for diversion of Land within Eco Sensitive Zone of Karnala Bird Sanctuary. | प्रकल्प यंत्रणेने दि.२२/०१/२०१४ चे पत्रान्वये महामार्गाचे रुंदीकरणा करीता वन (संवर्धन) अधिनियम १९८० अंतर्गत अभयारण्याचे सिमेबाहेरील १०.००कि.मी.परिसरात (पर्यावरण संवेदनशिल क्षेत्रात) येणारे ९.०३हे. क्षेत्र वळतीकरण्याचा जो सद्यस्थितीत प्रस्ताव सादर केलेला आहे त्यामध्ये कर्नाळा पक्षी अभयारण्यातील वनजमिनीची आवश्यकता नाही. अभयारण्याचे क्षेत्राबाहेर रूंदीकरण झाल्यानंतर त्या महामार्गावरुन वाहनांची जी वर्दळीची वाहतूक होणार आहे ती अभयारण्य क्षेत्रात थोडयाफार प्रमाणात कमी होण्याची शक्यता वर्तविली आहे.<br>अपर प्रधान मुख्य वनसंरक्षक (वजी) मुंबई यांनी खाली नमुद शर्ती व अटी वर प्रस्तावाची शिफारस केलेली आहे.<br>रस्त्याचे रुंदीकरण अभयारण्याच्या हद्दीपासून १.०० कि.मी अंतराबाहेरील क्षेत्रात सिमीत असावे.<br>**अ.अभयारण्याच्या** हद्दीपासून १.०० कि.मी. ते अभयारण्यातून जाणा-या रस्त्यावर सुयोग्य गतिरोधक टाकण्यात यावे. व वाहनाची | **प्रकल्पाच्या अंदाजीत खर्चाच्या २% एवढी रक्कम वन्याप्राण्यांच्या वसतीस्थानांचा विकास आणि संरक्षण या कामाकरिता संबंधीत वन्यजीव विभागाकडे जमा करण्याच्या तसेच मुख्य वन्यजीव रक्षक यांनी दिलेल्या अटीसह सदर प्रस्तावाची राष्ट्रीय वन्यजीव मंडळास शिफारस करण्यास्तव या प्रस्तावास मंडळाने मान्यता प्रदान केली.** |

| | | | |
|---|---|---|---|
| | | वर्दळ अस्तित्वात असलेल्या रस्त्यावरुनच होईल.<br>**ब.** अभयारण्याच्या क्षेत्रातून जाणा-या वाहनाचा वेग ३० कि.मी प्रती तास राहील. तसे मर्यादा दर्शक फलकठळक पणे रस्त्याचे दर्शनीभागात लावावेत.<br>१. अभयारण्याच्या सिमेवर वाहतूकीचे सूचना दर्शक फलक लावून अभयारण्याच्या क्षेत्रातून वाहनाची वाहतूक नियंत्रीतहोईल अशी उपाययोजना करावी.<br>२. बाधीत क्षेत्र अतिपावसाचे क्षेत्र आहे म्हणून दरडी कोसळणे, रस्ता पाण्याखाली जाणे इ.चे अनुषंगाने यथायोग्य उपाययोजना करण्यात याव्यात.<br>३. कर्नाळा अभयारण्याचे क्षेत्रात वाहनाचे हॉर्न वाजविण्यास बंदी राहील.<br>४. वनविभाग व वन्यजीव विभागाचे सल्ल्याने वन्यप्राण्यांना हालचालीसाठी अभयारण्याच्या रस्त्यावर आवश्यकतेथे छोटे पूल/मो-या बांधण्यात याव्यात.<br>5. वन्यजीव व्यवस्थापनवर होणा-या प्रतिकुल परिणामावर उपाययोजना करण्यासाठी रु. ५० लक्ष निधी प्रकल्प यंत्रणेने उपलब्ध करुन दयावा.<br>उपरोक्त सर्व परिस्थितीचा विचार करता प्रस्ताव शासनास दि. १४-०२-२०१४ अन्वये सादर केलेला असून त्यास राज्य वन्यजीवमंडळा समोर त्यांचे अनुमोदनार्थ व विचारार्थ ठेवण्यात आला होता. | |
| ७.३ | **URAN-CHAKAN-SHIKRAPUR-LPG PIPE LINE PROJECT Laying of** | प्रस्तावित भूमिगत पिगॅबल (Piggable) गॅस पाईप लाईनचे अंतरहे कर्नाळा पक्षी अभयारण्याचे सिमेपासून अंदाजे ०.५७६ कि.मी. अंतरावर असुन कर्नाळा पक्षी अभयारण्याचे प्रस्तावित पर्यावरण संवेदनशील क्षेत्रात येत असल्याने वनेत्तर | **प्रकल्पाच्या अंदाजीत खर्चाच्या २% एवढी रक्कम वन्याप्राण्यांच्या वसतीस्थानांचा विकास आणि संरक्षण या कामाकरिता संबंधीत वन्यजीव विभागाकडे जमा करण्याच्या तसेच मुख्य वन्यजीव रक्षक यांनी दिलेल्या अटीसह सदर प्रस्तावाची राष्ट्रीय वन्यजीव मंडळास** |

| | | | |
|---|---|---|---|
| | **12"diameter underground Piggable LPG Pipeline, along with 6" dia Optical Fibre Cable (OFC) passing near Karnala Bird Sanctuary)** | कामे करण्यासाठी त्यास राज्य वन्यजीव मंडळाची मान्यता घेणे आवश्यक असून राष्ट्रीय वन्यजीव मंडळाची मान्यता घेणेसुध्दा आवश्यक आहे. त्यामुळे या कार्यालयाने काही शर्ती व अटींवर कामास मंजुरी मिळण्यास दि. १८-०२-२०१४ चे पत्रान्वये खालील प्रमाणे शिफारस केलेली आहे.<br>• उरण चाकण शिकरापूर या भागातून जाणा-या गॅस पाईपलाईनचे सतत संनियत्रण करावे. तसेच प्रत्येकतीन महिन्यानी वन विभाग व प्रकल्प यंत्रणेच्या अधिका-यांनीसंयुक्त पाहणी करावी या अटीवर प्रस्तावाची शिफारस करण्यात येत आहे.<br>• प्रकल्प यंत्रणेने वन्यप्राण्याचा अधिवास सुधारणा, रोपवन आणि पिण्याच्या पाण्यासाठी नविन पाणस्थळे निर्माण करण्यासाठी रु एक कोटी वनविभागास पुरविण्यात यावे.<br><br>सदरप्रस्ताव राज्य वन्यजीव मंडळाचे अनुमोदनार्थ व विचारार्थ ठेवण्यात आला आहे. | **शिफारस करण्यास्तव या प्रस्तावास मंडळाने मान्यता प्रदान केली.** |
| ७.४ | मोकाट कुत्री संरक्षीत क्षेत्रात येवू नयेत आणि वन्यजीवांना canine distemper रोग होवू नये यासाठी करावयाच्या उपाययोजना. | मोकाट कुत्री तसेच मांसाहारी वन्यजीव यांना canine distemper रोग होवू शकतो आणि यात वन्यप्राणी दगावण्याची प्रबळ शक्यता असते त्यामुळे याबाबत सर्व वनक्षेत्र आणि वन्यजीव संरक्षीत क्षेत्रामध्ये उपाययोजना महत्वाच्या आहेत. मोकाट कुत्र्यांना हा रोग नाही याची खात्री करण्यासाठी वनक्षेत्र आणि वन्यजीव संरक्षीत क्षेत्रामध्ये प्रवेशीलेल्या कुत्र्यांचे नमुने गोळा करून तपासणीसाठी प्रयोगशाळेत पाठविण्यांत यावेत आणि हा रोग नसल्याची पुरेपुर खात्री करावी. | **मोकाट कुत्र्यांना canine distemper रोग नाही याची खात्री करण्यासाठी वनक्षेत्र आणि वन्यजीव संरक्षीत क्षेत्रामध्ये प्रवेशीलेल्या कुत्र्यांचे रक्ताचे नमुन गोळा करून ज्या नमुन्यांमध्ये हा रोग असल्याचे निदान झाले आहे त्याठिकाणी वन विभागाने पशुसंवर्धन विभागाच्या मदतीने वाघ, बिबट व अन्य वन्यप्राणीचे जीवरक्षेसाठी जरूर ती उपाययोजना तात्काळ अंमलात आणावी.<br>वनक्षेत्र किंवा वन्यजीव संरक्षीत क्षेत्रालगतच्या भागात जागृती करून प्रत्येक पाळीव कुत्र्यांच्या गळयाला पट्टा लावण्यासाठी लोकांना उद्युक्त करावे.<br>मोकाट कुत्र्यांच्या मागे मानवी वसाहतीमध्ये बिबट येण्याची जास्त शक्यता असते यास्तव त्या भागात याविषयी जागृती करून नागरिकांना सतर्क करावे असे निर्देश दिलेत व मोकाट कुत्रे वरीलप्रमाणे सर्व उपाययोजना करूनही वन्यजीव अधिवासात येवून रोग पसरविण्याचा धोका निर्माण करत असतील तर मोकाट कुत्रे बळाचा वापर करून त्यांचे वन्यजीव अधिवासात येण्यावर प्रतिंबध करणे योग्य राहील.** |

| | | | |
|---|---|---|---|
| ७.५ | वन अधिकारी यांच्या वाहनावर अंबर दिवा लावण्यासाठी मान्यता देणे. | वन व वन्यजीव विभागातील वन्यजीव वन संरक्षण कायद्याचे अंमलबजावणीसाठी निगडीत अधिकारी यांच्या शासकिय वाहनावर अंबर दिवा लावण्याबद्दलचा प्रस्ताव शासनाचे विचाराधीन आहे. यास लवकरात लवकर मंजूरी देण्याची विनंती मा. मंत्री (वने) यांनी अध्यक्ष महोदयांना केली. सदस्यांनी वन विभागाच्या कायदा व सुव्यवस्था हाताळणा-या वन अधिका-यांच्या वाहनावर अंबर दिवे लावण्याची मंडळाच्या ७ व्या बैठकीमध्ये मा. अध्यक्षांनी निर्देश देवूनही अजुनपर्यंत सदर परवानगी मिळाली नाही असे मा. अध्यक्ष महोदयांच्या निदर्शनास आणून देवून यावर तात्काळ कार्यवाही करणेस्तव विनंती केली. | **मा. अध्यक्षांनी याबाबत संबंधीत विभागांनी त्वरीत कार्यवाही करण्याच्या सूचना दिल्या.** |
| ७.६ | वन्यप्राण्यांमुळे होणा-या शेतपीकांच्या तसेच फळबागांची नुकसान भरपाई देण्याबाबत | मंत्रीमंडळाने दिलेल्या निर्देशाचे अनुषंगाने वन्यप्राण्यांमुळे होणा-या शेतपीकांच्या तसेच फळबागांची नुकसान भरपाई देण्यासाठी श्री. एस.डब्ल्यु. एच. नकवी, तत्कालीन प्रधान मुख्य वनसंरक्षक (वन्यजीव) यांच्या अध्यक्षतेखाली एक समिती नेमण्यात आलेली होती. सदर समितीने आपला अहवाल शासनास सादर केलेला असून सदर अहवालातील ठळक मुद्यांवर मंडळासमोर सादरीकरण करण्यांत आले. | **समितीने सादर केलेला अहवाल मंडळाने स्विकृत केला. अहवालातील शिफारसींवर पुढील कार्यवाही करणेस्तव संबंधीतांना शासनाकडून निर्देश जारी करावेत असे मा. अध्यक्ष महोदयांनी सूचीत केले.** |
| ७.७ | विविध विभाग किंवा उद्योग यांचे जे प्रस्ताव राज्य वन्यजीव मंडळासमोर चर्चेस ठेवल्या जातात ते प्रस्ताव वेबसाईटवर ठेवण्याविषयी | मंडळाच्या सदस्यांना अभ्यास करण्यासाठी सोईचे व्हावे म्हणून प्रस्ताव वेबसाईटवर उपलब्ध करता येवू शकतील कां ? याविषयी चर्चा करण्यांत आली. | **शासनाकडून विषयसूची मंजूर झाल्यानंतर मंडळाच्या सदस्यांना पासवर्ड देवून असे प्रस्ताव वेबसाईटवर उपलब्ध करून द्यावेत असे निर्देश दिलेत.** |